# शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती चेकचे वाटप




शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती विद्यार्थिनींना चेकचे वाटप करताना प्राचार्य डॉ.विजयकुमार पाटील, डॉ. बी. एन. रावण, प्रा. पी. डी. माने, डॉ. यु. एन. लाड, प्रा. एम. वाय. पोवार, प्रा. जगदीश सरदेसाई, पांडुरंग सातपुते, प्रा. आर. बी. पाटील व मान्यवर

श्रीपतराव चौगुले आर्ट्स ॲण्ड सायन्स कॉलेज, माळवाडी-कोतोली येथील विद्यार्थिनींना शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर यांची गुणवत्ता शिष्यवृत्ती अनुक्रमे रेश्मा धनाजी कांबळे रुपये १५०००/- , पूजा पांडुरंग कराळे रुपये १५०००/-,साक्षी संजय लव्हटे रुपये ५०००/-, समीक्षा प्रकाश जाधव रुपये ५०००/-, सायली बाजीराव पाटील रुपये ५०००/- मिळाली त्याचे वाटप प्राचार्य डॉ.विजयकुमार पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

यासाठी त्यांना ज्ञानगंगा शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक-अध्यक्ष डॉ.के.एस.चौगुले,संस्था सचिव शिवाजीराव पाटील,प्राचार्य डॉ. विजयकुमार पाटील,शिष्यवृत्ती समिती प्रमुख प्रा.पी.डी.माने व शिक्षक प्रशासकीय कर्मचारी यांचे मार्गदर्शन लाभले.

या विद्यार्थिनींचे महाविद्यालय व महाविद्यालय परिसरामध्ये अभिनंदन होत आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत शिष्यवृत्ती समिती प्रमुख प्रा.पी.डी.माने यांनी केले तर आभार प्रा.एम.वाय.पोवार यांनी मानले.